UGC Vidyawarta Jr.No.62759 UGC Approved Refereed Journal

(Special issue)

Vidyawarta®

Peer Reviewed International Research Journal

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Samiksha

Vol-02

March – 2018

|| Editor ||

Prof.Virag S.Gawande
Dr.Sanjay j. Kothari
Dr. Dinesh W.Nichit

Published By

Sant Gadge Maharaj Art's, Comm. & Sci. Collage Walgaon, Dist.Amravati

&

Aadhar Social Research Development Training Institute, Amravati.

## || Index ||

1) THE IMPORTANCE OF PHYSICAL EDUCATION IN TODAY'S SCHOOLS
**Umesh Satyanarayan Vyas, Wani** || 06

2) The concept of Nai Talim as advocated by Mahatma Gandhi
**Snehal Shriwastawa, Nagpur** || 10

3) Husbands' support in wives' upward mobility in corporate career
**Shailesh Badre & Dr. Milind Gulhane, Nagpur** || 15

4) Preventive and Curative Effects of Yoga
**Satish S. Bhagwat, Dist- Amravati** || 20

5) Role of Reference Group on Clothing Buying Behaviour of College Going S...
**Sadhana S. Patil, Nagpur** || 22

6) GST AND INDIAN ECONOMY APPROACH
**Raju Madan Prasad, dist-Yavatmal (MH)** || 25

7) WTO AND ITS IMPACT ON THE DIFFERENT SECTORS OF THE ECONOMY
**Prof. Sachin D. Gedekar**, Chandrapur (Maharashtra) || 28

8) Need and Importance of Innovative Stepsin teaching and Learning
**Prof. Dr.Virendra B. Turkar, Lakhandur** || 32

9) A BRIEF STUDY OF THE THEORY AND PRACTICE OF TRANSLATION IN INDIA
**Prof. Dr. Shweta Sanjay Bajpai, Dist. Nagpur** || 35

10) "Role of Indian Judiciary in sustaining the development for better tomorrow"
**Prachi Nitin Shinde, Amravati** || 44

11) EVALUTION STUDY OF "IAY" INDIRA AWAS YOJANA IN NAGPUR DISTRICT
**Prabhakar Motghare & Dr. Gopal Zade, Mouda** || 51

12) Employee Retention in Indian Software Organisations
**Pallavi Badre (Ughade) & Dr. Milind Gulhane, Nagpur** || 55

13) Growth of E-commerce in India
**Dr.Rajesh M. Deshmukh, Amravati (Maharashtra)** || 61

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

14) YOGA –IMPORTANT FOR MODERN HUMAN LIFESTYLE
**Dr. Dipak G. Arajpure, Distt. Nagpur** || 65

15) Elements of Romanticism in the Poetry of William Wordsworth
**Dr. G. O. Jondhalekar, Telhara** || 68

16) Impact Of Nepotism & Corruption On Indian Economy
**Dr. Vaishali Fating, Nagpur** || 72

17) IMPORTANCE OF NUTRITION EDUCATION FOR DAILY LIFESTYLE
**Dr. Shubhangi Kukekar, Nagpur** || 77

18) Human Resource Management and Today's Organizations
**Prof. Dr. Rekha Gulhane, Nagpur** || 79

19) Indian Education System And Human Resource Development In Indian...
**Prof. Dr. Milind Gulhane, Nagpur** || 85

20) Role of Medical Inspection in Schools
**Dr. Subhash M. Shekokar, Dist- Chandrapur (M.S ) India** || 88

21) Most Influencing Antecedents of Consumer's Perception Affecting his....
**Anchal Arora & Dr.H.S.Chahal, Amritsar** || 90

22) Rural and Urban Dynamics and Poverty
**Atul P. Naik, Mouda** || 94

23) Sociological School and Its Applicability In India
**Dr. Bhagyashree A. Deshpande, Amravati** || 98

24) Importance of Sports In Personality Development of Students
**Dr. Kamini Mamarde, Dist. Buldana** || 102

25) BUDDHIST PHILOSOPHY: A GIFT TO ENHANCE WORLD PEACE
**DR. MANOHAR KUMBHARE, Nagpur** || 104

26) GST- A GAME CHANGER FOR THE INDIAN ECONOMY
**Latha Palekar, Pune** || 107

https://sites.google.com/site/vidyawartajournal http://www.vidyawarta.blogspot.com

27) Digital Library in Modern Era
**Dr. Rajkishor Shivshankar Gupta, Dist. Nagpur** || 111

28) लिंगभेद असमानता
**प्रा. डॉ. मनोजकुमार का. भोवते, लाखनी** || 117

29) मानवाधिकार के संदर्भ में गोंदिया जिले कि अनुसूचित जाति की महिलाओं के...
**डॉ. डॉ. शारदा महाजन महाजन & कु. अंकला माने, गोंदिया** || 119

30) विशेष आर्थिक क्षेत्राचे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम
**प्रा. चांगदेव केशव भाजीखाये, पवनी** || 126

31) स्त्रीभ्रूणहत्या एक सामाजिक समस्या
**प्रा. दामोदर चं. दुधे, जि. यवतमाळ** ||131

32) लोकसाहित्यकार एकनाथ
**प्रा. शिल्पा नेवे, मुंबई** ||133

33) भारतातील कृषी श्रमीक आणि किमान वेतन कायदा
**Dr. Vidya P. Channe, Pulgaon** || 139

34) ट्रीपल तलाक आणि मुस्लिम स्त्री
**Ku. Hemlata Anandrao Urade, District. Gadchiroli** ||143

35) **जी.एस.टी. चा भारतीय अर्थव्यवस्थेवरील प्रभाव**
**प्रा.डॉ. शालिनी पांडे** ||147

36) माहिती तंत्रानाचा सेवा क्षेत्रावर प्रभाव ||151
**प्रा. संजय उल्हे, नांदुरा**

International Multilingual Research Journal
Printing Area
9850203295 7588057695
Editor Dr.Bapu G.Gholap

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

39

# माहिती तंत्रज्ञानाचा सेवा क्षेत्रावर प्रभाव

प्रा. संजय उल्हे
श्री. पुंडलिक महाराज महाविद्यालय, नांदुरा

=========***********========

**प्रस्तावना :-**

आजच्या तंत्रज्ञानामध्ये समृध्द झालेल्या युगामध्ये अनेक लोक एकमेकांशी संवाद साधण्यासाठी, विचाराची देवाण-घेवाण करण्यासाठी वस्तु व उत्पादनाची खरेदी-विक्री करण्यासाठी, विचाराची देवाण-घेवाण करण्यासाठी वस्तु व उत्पादनाची खरेदी-विक्री करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर E-mail, E-commerce आणि Internet याचा वापर मोठ्या प्रमाणावर करू लागले आहे. आपले व्यक्तिगत जीवन अधिक समृध्द आणि ज्ञान मनोरंजक होईल असे माहिती व तंत्रज्ञानामध्ये बरेच उपयोग निर्देशनास आले आहे.

कोणतीही प्रक्रिया गुणवत्ता पूर्ण कमी खर्चात, खात्रीशीर पध्दतीने करण्यासाठी लागणाऱ्या माहितीचा वापर करून उत्पादकता वाढविणे यासाठी वापरले जाणारे तंत्रज्ञान म्हणजे माहिती तंत्रज्ञान होय.

माहिती तंत्रज्ञान म्हणजे संगणकाधारित माहिती पध्दतीचे प्रबंधन अभ्यास संरचना, विकास अनुपालन होय. विशेषत: Software, Application व Computer hardware चा समावेश होतो.

डिजीटल टेक्नॉलॉजीच्या विविध साधनांच्या माध्यमातून देवाण-घेवाण करण्यासाठी जे यंत्र वापरण्यांत येते ते यंत्र म्हणजे माहिती तंत्रज्ञान होय.

यावरून माहिती व तंत्रज्ञानाची व्यापक व्याख्या खालीलप्रमाणे माहितीची निर्मिती साठवण एकत्रिकरण, माहितीचे वितरण, प्रस्तुकीकरण, सादरीकरण प्रक्रिया व संदेशवहन करणे होय.

**माहिती तंत्रज्ञानाचा वापर :-**

१. माहिती तंत्रज्ञानाचा वापर कोणत्याही कार्यासाठी करतांना माहितीची साठवण डिजीटल स्वरूपात करणे.
२. माहितीतुन योग्य निष्कर्ष जलद होण्यासाठी कॉम्प्युटरचा वापर करणे.
३. माहितीची देवाण-घेवाण जलद स्वस्थ खात्रीशीर पध्दतीने करणे.
४. माहितीच्या योग्य वापरासाठी विविध उपकरणाचा वापर करणे.

संगणक हे माहिती तंत्रज्ञानासाठी वापरले जाणारे सर्वात महत्वाचे यंत्र आहे. माहिती तंत्रज्ञानामुळे कोणत्याही क्षेत्रात अचुकता, गुणवत्ता व उत्पादकता वाढविणे शक्य होते. अगदी ग्रामोद्योगापासून ते विश्वव्यापी उद्योगापर्यंत तसेच देशाच्या लोकांना मिळणारच आहे. माहिती तंत्रातील क्रांतीमुळे जागतिकीकरणाचा जोरदार असेल त्या विषयावर माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून आवश्यक असलेली माहिती मिळवीता येते. माहिती तंत्रज्ञानाचा शिक्षणात उत्तम प्रतिसाद आहे. त्याचे कारण म्हणजे शिक्षणाचा संबंध माननीय गरजांशी आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा प्रमाणेच माहिती सुध्दा एक मुलभूत गरज बनली आहे. उद्योग व व्यापार क्षेत्र, शिक्षण, मनोरंज तथा चित्रपट उद्योग सुध्दा माहिती तंत्रज्ञानावर आधारलेले उद्योग आहे. अशावेळी उपयुक्त दृष्टीने माहिती तंत्रज्ञानाचा जीवन व्यवहारात उपयोग करणे गरजेचे आहे. माहिती तंत्रज्ञानामुळे मानवीय जीवनात प्रचंड क्रांती झालेली आहे.

**व्यावसायिक व सामाजिक माहिती तंत्रज्ञानाचा सेवा क्षेत्रावर प्रभाव :-**

**१. आर्थिक क्षेत्र :-**

एखादी व्यक्ती व छोटीसी संस्था किंवा पेढी जरी हे आर्थिक व्यवहार पारंपारिक पध्दतीने पार पाडत असली तरी मध्यम व मोठा व्यापारी व्यवसायाची उलाढाल सांभळण्यासाठी कॉम्प्युटरची गरज घेतात. यामध्ये वापर उद्योग व व्यवसायाचे हिशेब कॉम्प्युटरमध्ये ठेवता येतात. पावती करणे, बिल करणे, खात्यांत नोंद करणे, नफातोटा पत्रक, ताळेबंद तयार करणे व सर्व हिशेब प्रक्रिया त्वरित व अचूक करणे माहिती तंत्रज्ञानामुळे सहज शक्य होते.

**२. उत्पादन क्षेत्र :-**

माहिती तंत्रज्ञानामुळे उत्पादनाला सुरुवात करण्यापूर्वी नमुन्यादाखल एक उष्णता, दाब, तान यामुळे काय परिणाम होतात याचे संपूर्ण प्रयोग यंत्रावर न होता कमी वेळात उत्पादन सुरु

झाल्यावर स्वयंचलित यंत्रे वापरण्याच्या पूर्वीपासून

कारखानदाराचा क्रांती तर झालीच परंतु उत्पादनाचा दर्जा व अचुकता यालाही वेग आला आहे.

**३. जाहीरात क्षेत्र :-**

विविध वस्तु व सेवांच्या जाहीराती या अनेक प्रकारच्या माध्यमातून ग्राहकापर्यंत पाठविल्या जातात. जाहीरात ही ६५ वी कला म्हणून म्हटल्या जाते. प्रसार माध्यमातून जाहीराती प्रसार करण्यासाठी तसेच तयार सुध्दा करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाच्या आणि संगणकाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो. सर्व प्रकारच्या जाहीराती विविध Software Programs द्वारा तयार केल्यामुळे त्या सुंदर तसेच मनमोहक, चितवर्धक होतातच. त्यामुळे वस्तु व सेवांच्या मागणीमध्ये प्रचंड वाढ होऊन विक्री मोठ्या प्रमांणावर होते.

**४. शिक्षण क्षेत्र :-**

आजच्या स्पर्धेच्या युगात शिक्षणाला अतिशय महत्व आहे. म्हणूनच प्रत्येक विषयाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. प्रत्येक विषयावरील शिक्षण क्षेत्रात दोन प्रकारच्या पायऱ्या असतात. प्रथम म्हणजे विद्यापीठे, शाळा, महाविद्यालये विद्यार्थी हे घटक एकमेकांना विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त ठराविक काळात ज्ञान देणे तसेच शैक्षणिक माहितीचे आदान प्रदान करणे. दुसऱ्या क्षेत्रात विविध घटकाचा वापर करून शैक्षणिक क्षेत्रामध्ये वेगवेगळे विषय शिकविण्याकरिता तयार केलेले प्रोग्राम, इंटरनेट, सीडी, पेन ड्राईव्ह यासारख्या विविध माध्यमातून घर बसल्या पोहचविणे. दुसरे पर्याय म्हणजे त्यांनी किती ज्ञान ग्रहण केले याची परिक्षाद्वारा तपासणी करणे त्यात तृटी असल्यास त्या दूर करणे याकरीता माहिती तंत्रज्ञानाच्या घटकांचा वापर अर्ज भरण्यापासून ते ऑनलाईन परिक्षा घेणे व निकाल लावणे इ. शिक्षण क्षेत्रातील विविध प्रक्रिया माहिती तंत्रज्ञानामुळे जलद झाल्या आहेत.

**५. क्रीडा क्षेत्र :-**

क्रीडा क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानामुळे बरेच बदल घडवून आलेले आहेत. म्हणजेच विविध खेल खेळता येतात. संगणकावर एखाद्या खेळाची माहिती देवून खेळाडूचे वय, उंची, वजन, खेळाडूचे रक्तगट शारीरिक घटक तसेच संगणकामध्ये विविध खेळ खेळण्यासाठी त्यांचे Software बनविणे विविध प्रकारचे Remot द्वारा Robotes बनविणे. मैदानावरील खेळाडूचे प्रशिक्षण तसेच त्यांचे वैयक्तिक व्यक्तिमत्व प्रगत करणे माहिती तंत्रज्ञानामुळे शक्य झाले.

**६. वैद्यकिय क्षेत्र :-**

सध्याच्या युगात माहिती तंत्रज्ञानामुळे डॉक्टर्स, औषध निर्माते त्याचे अभिकर्ते औषध विक्रेते वैद्यकिय प्रयोगशाळा, दवाखाने व त्यात उपलब्ध सोयी, रक्तपेढ्या, रक्तदाते इत्यादींची माहिती माहिती तंत्रज्ञानामुळे सहज शक्य झाली. त्यामुळे समाजाच्या सर्व घटकांच्या आयुष्यामाणामध्ये निश्चित वाढ झालेली आहे असे म्हणता येईल.

**७. वाहतुक क्षेत्र :-**

वाहतुक क्षेत्रातील व्यापार व सेवा विषयक बाबींच्या संदर्भात वाहनाचे वेळापत्रक तयार करणे आरक्षण व्यवस्था मग ती कोणत्याही ठिकाणावर असो वाहुन नेण्याकरिता मालाची नोंद करणे ती कोणत्या विभागामार्फत रेल्वेच्या कटनेर मध्ये केव्हा करावयाच्या वाहुन नेण्याचे मुल्य किती इत्यादी सर्व गोष्टीची पूर्वतयारी व अंमलबजावणी ही माहिती तंत्रज्ञानामुळे शक्य झाली आहे. वाहतुक क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग व्यापारी सेवा तांत्रिक अशा तिन्हीही बाबीसाठी होते.

**८. संचार क्षेत्र :-**

एकेकाळी टेलीग्राम व विविध भाषेमध्ये एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे पाठविल्या जात होता. त्याला बराच कालावधी लागत असे. त्यानंतर फॅक्स सेवेचा उपयोग होवू लागला. त्यामुळे अक्षरे व आकृत्या सुध्दा काही तासातच पाठविता येऊ लागल्या. माहिती तंत्रज्ञानामुळे Internet द्वारे अक्षर चित्रच नाही तर संपूर्ण मोठमोठे संगणकीय प्रोग्रॅम हे काही सेकंदात एकमेकांना पाठविता येणे शक्य झाले.

**९. संरक्षण क्षेत्र :-**

संरक्षण क्षेत्रामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर उद्योग होत असल्यामुळे संरक्षण क्षेत्रातील विमाणे, हेलीकॉप्टर, दानबुड्या यांना देण्यात येणाऱ्या नियंत्रण कक्षाचे संदेश त्याच्या वरून सोडविलेले असते. लक्षापयंत पोहचविण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर केला जातो.

**१०. सिनेमा क्षेत्र :-**

सिनेमा क्षेत्रामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. प्रेक्षकांच्या मनावर खास परिणाम व्हावा यासाठी अनेक दृश्ये सिनेमामध्ये माहिती तंत्रज्ञानाच्या घटकाचा

वापर करून त्यावर तयार केली जातात. माहिती तंत्रज्ञानाचा सिनेमासारख्या व्यावसायिक तत्वावर मोठा प्रभाव पडला असून सिनेमातील दृश्यांनी ध्वनी व संगीताकरिता मल्टीमिडीयाच्या उपयोगामुळे सिनमो क्षेत्रात क्रांती झालेली दिसून येते.

**११. बँकींग क्षेत्र :-**

जागतिकीकरणाच्या नावाखाली स्पर्धेत टिकण्यासाठी बँकाच्या युनियन बरोबर IBN ने करार करून १००% संगणकीकरण करून घेतले. माहिती तंत्रज्ञानामुळे बँकेचे सर्व व्यवहार जलद गतीने होण्यास मदत झाली. ATM माध्यमातून दिवसभरात म्हणजे २४ तासात कधीही पैसे काढणे सोयीचे झाले. ग्राहकांच्या माहिती तंत्रज्ञानामुळे त्यांच्या गरजा पूर्ण होत आहे.

**१२. विमा क्षेत्र :-**

प्रत्येक व्यक्तीवर कोणती आपत्ती कधी येईल हे सांगता येत नाही मग ती व्यक्ती गरीब असो की श्रीमंत त्या व्यक्तीला आलेल्या आपत्तीला तोंड द्यावेच लागते. त्या आपत्तीमुळे कौटुंबिक संस्था विस्कळीत बनते. अशावेळी आर्युविमा हा घटक ती कुटुंब संस्था सांभाळण्याची व्यवस्था करणे विमेदाराला त्याच्या गरजेच्या वेळी पैसे उपलब्ध करून देणे यामध्ये आर्युविमाच्या जगभरातील कंपन्यामध्ये पहिला क्रमांक लागतो. पहिला पंचवार्षिक योजनेपासूनच आयुर्विमाने देशातील जवळपास सर्वच मोठ्या पायाभूत प्रकल्पांना आर्थिक मदत केली आहे. संगणकाचा सर्वाधिक वापर करणाऱ्या LIC ला माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा योग्य वापर केल्याबद्दल अनेक पुरस्काराने ज्यामध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर पुरस्कारने पुरस्कारित केले आहे.

**१३. कृषी क्षेत्र :-**

शेतीमध्ये कसलं आलं तंत्रज्ञान? असा विचार जर तुमच्या मनात आला असेल तर आधुनिक सलग्न व्यवसाय पुरेसे ज्ञान नाही, असे म्हणावे लागेल. आतापर्यंत शेती व शेतीशी सलग्न व्यवसाय पारंपारिक पध्दतीने केले जायचे परंतु तंत्रज्ञानातील वेगवान बदलांवामुळे शेती व्यवसायानेही एक नवीन सुरुवात केली आहे. माहिती तंत्रज्ञान कृषी अभियांत्रिकी तंत्रज्ञान अशा आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करीत शेतीच्या तंत्रात नवीन बदल होत आहे. भारतात सर्वाधिक लोकसंख्या शेतीवर अवलंबून असताना कृषी क्षेत्राची पिछेहाट होत असतानाही कृषी क्षेत्रात चांगले रोजगार निर्माण करण्याची गरज आहे. भारतात धवलक्रांती नंतर दुग्ध व्यवसाय भरभराटीला आला आहे. दुध देणाऱ्या पशुंचे संगोपन त्यांचे रोगापासून संरक्षण त्यांच्या पाठीला पोशख पशु खाद्य निर्मीती दुधापासून टिकावू पदार्थ बनविणे, त्यांचे विक्री इ. मध्ये तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला. म्हणुनच कृषी क्षेत्रामध्ये माहिती तंत्रज्ञान अत्यंत आव्हाणात्मक सर्जनशिलता, वाव देणारे व आनंददायी होऊ शकते यात शंका नाही.

**निष्कर्ष :-**

माहिती युगाला तंत्रज्ञानाच्या प्रगतीची जोड मिळाल्यामुळे माहिती तंत्रज्ञानाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. तंत्रज्ञानामुळे नवनवीन माहिती मिळविणे संघटन करणे, साठवणे व जास्तीत जास्त अचुक माहिती एखादा निर्णय घेताना उपलब्ध करून घेणे शक्य झाले आहे. जनतेला व्यक्तिगत अथवा व्यावसायिक कामासाठी प्रभावीपणे माहितीचा वापर करण्यासाठी I.T. क्षेत्र उपयुक्त ठरते.

**संदर्भ :-**

१. ई-कॉमर्स - प्रा. कोसने
२. माहिती तंत्रज्ञान व डाटा बेस प्रोसेसिंग - प्रा. शरद काळे
३. अर्थसंवाद